**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०२३-२४/शिष्यवृत्ती/ 8022 दिनांक : १७.०१.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - सन २०२३-२४ मध्ये दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं- परीक्षा शुल्क-२०२३-२४ दि. ०४.१२.२०२३.

उपरोक्त विषयांबाबत कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना मा. शिक्षण संचालक यांचे संदर्भिय पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्राचे आणि शासन निर्णयाचे अवलोकन करावे.

**तथापि सर्व महाविद्यालयांकडून सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन सोबत जोडलेल्या सोबत दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यामध्ये अचूक माहिती भरुन तातडीने पाठवा.**

https://forms.gle/ZVuUbamiafPHAG6p8

**उपरोक्त नमूद माहिती दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थी ज्याने अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा तसेच आर्थिक सवलतीचा लाभ घेतला नाही असा कोणताही विद्यार्थी परीक्षा फी माफीच्या लाभापासून वंचित रहाता कामा नये याची पूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची आणि संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिवांची राहील.**

**( डॉ. केशव तुपे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे तपशीलाचे विवरणपत्र

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपूर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपूर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |